# परिशिष्ट – १

## श्री गुरू अमरदास यांचे संक्षिप्त चरित्र

श्री गुरू अमरदास हे शिखांचे तिसरे गुरू. वयाच्या सत्तराव्या वर्षी ते गुरूपदी विराजमान झाले. वयाच्या साठाव्या वर्षी ते शीखांचे दुसरे गुरू श्री अंगददेव यांच्या संपर्कात आले व गुरूपदी विराजमान झाल्यावर तब्बल पंचवीस वर्षे त्यांनी शीख धर्मचा प्रसार केला. हे सारे कसे घडले ह्याचा मागोवा घेऊ या.

**जन्म व बालपण**

अमरदासांच्या जन्म अमृतसर जिल्ह्यातील बासरके या गावी ५ मे १४७९ ह्या दिवशी झाला. त्यांच्या पित्याचे नाव तेजभान भल्ला व मातेचे नाव लखमी (लक्ष्मी) देवी असे होते. हे खत्री घराणे होते. ते घराणे आपणास प्रभू रामाचे वंशज समजतात. श्री तेजभान यांचा शेती व व्यापार असा व्यवसाय होता.

अमरदासांना आणखी तीन लहान भाऊ बाबा ईशरदास (ईश्वरदास), बाबा खेमराय, व बाबा मानकचंद अशी त्यांची नावे. ह्या सर्वांचा पुढे शीख धर्म प्रचाराचे कामी फार मोलाचा सहयोग प्राप्त झाला. भाई गुरूदास हे ईशरचंदजी यांचे पुत्र. यांनी पुढे श्रीगुरू अरजनदेव यांना श्रीगुरू ग्रंथ साहिबच्या संकलनास मोलाची मदत केली आहे. तसेच शिख धर्म प्रचारात मोलाची कामगिरी ही बजावली आहे. बाबा मानकचंद यांचा मुलगा भाई जरसू याचा विवाह श्रीगुरू अंगदेवांची मुलगी बाबी अमरो हिच्याशी झाला होता. ह्या अमरोमुळेच पुढे अमरदासांची व श्री गुरू अंगद देवांची भेट झाली आहे.

अमरदासांचे वडील त्यांच्या अत्यंत सचोटीच्या व्यवहारामुळे व सर्वांना मदत करण्याच्या वृत्तीमुळे गावातील सर्व लोकांच्या आदरास प्राप्त झाले होते. मोठा मुलगा म्हणून अमरदास आपल्या वडलांच्या शेतीच्या व दुकानदारीच्या व्यवसायात लक्ष घालू लागले. ते ही वडीलांप्रमाणे परोपकारी वृत्तीचे होते. पण त्यांचा ओढा भगवत भक्तीकडे अधिक होता. ते साधु संतांच्या संगतीत रममाण होत. त्यांना व्यायामाची ही आवड होती. त्यामुळे त्यांचे शरीर ही सुदृढ होते.

अध्यात्माकडे कल असल्याने ते विवाह करण्याची टाळाटाळ करत होते. त्यांच्या इतर तीन भावांची लग्ने झाली पण त्यांनी विवाह करण्याचे टाळले. पण अखेर अमरदासांचे मन वळवण्यात त्यांच्या वडीलांना यश आले व वयाच्या २८ व्या वर्षी त्यांचा विवाह सिआलकोट जवळील सतखतरा गावच्या श्री देवीचंद बहल यांची मुलगी मनसा देवी हिच्याशी झाला. वयाच्या चाळीसाव्या वर्षांपर्यंत त्यांना मुलबाळ झाले नाही पण पुढे त्यांना दोन मुलगे व एक मुलगी अशी संतती झाली.

ईश्वरभक्त असल्याने वयाच्या पन्नासाव्या वर्षीपासून प्रतीवर्षी दोनदा हरीद्वारची यात्रा करण्याचा त्यांनी वसा घेतला. ह्या प्रमाणे त्यांनी वीस यात्रा पूर्ण केल्या एकवीसाव्या यांत्रेच्या वेळी एक घटना घडली. अमरदास भोजनोत्तर पायावर पाय टाकून विश्राम करत होते. त्यावेळी एक ज्योतिषी दुर्गादास तेथून जात होता. अमरदासांच्या तळपायावर पद्म चिन्ह पाहून तो आश्चर्यचकित झाला व त्यांनी भाकित वर्तवले की अमरदास एक सम्राट तरी होतील किंवा महान धर्मगुरू तरी होतील. ह्यावेळी अमरदासांचे वय साठ वर्षांचे होते त्यांनी ती भविष्यवाणी हसण्यावरी घालवली व त्यांनी आपली यात्रा पूर्ण करून ते घरी परतले. पण नियतीची चक्रे फिरत होती व लवकरच दुर्गादासांची भविष्यवाणी खरी होणार होती.

एकदा अमरदास आपले बंधु मानकचंद यांचेकडे गेले असता प्रात:काली त्यांना एका भक्ती गीताचे मधूर सूर ऐकू आले. ते गीत मानकचंदांची सून गात होती. ती श्री गुरू अंगद देवांची कन्या होती व ते पद ही श्री गुरू अंगद देवांची रचना होती. त्या भक्ती गीताने मोहीत होऊन अमरदास यांनी श्री गुरू अगंद देवांना भेटण्याची व त्यांच्या दर्शनाची इच्छा मानकचंदांची सून बीबी अमरोकडे व्यक्त केली. ती ही त्यांना तात्काळ श्री गुरू अंगद देवांकडे खदूरला घेऊन गेली. श्री गुरू अंगद देवांनी ही आपल्या सोयऱ्याचे यथायोग्य स्वागत केले. नियतीने एक पाउल पुढे टाकले होते भावी घटनांची ती नांदी होती.

अमरदासांनी श्री गुरू अंगद देवांचे घरी वास्तव्य केले व त्यांच्या एकूण व्यवहाराचे निरीक्षण केले. त्यांची साधी राहणी, अध्यात्मिक उंची व लोकांना देत असलेले धर्म शिक्षण व करत असलेला उपदेश ऐकून त्यांची खात्री झाली की ज्या संत गुरूच्या शोधात आपण होतो ते हेच होत. ते श्री गुरू अंगद देवांच्या चरणी लीन झाले. त्यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करलं व ते श्री गुरू अंगद देवांची काया वाचा मने सेवा करू लागले. त्यावेळी त्यांची साठी उलटून गेली होती. त्यांचे गुरू श्री अगंद देवजी केवळ पस्तीस वर्षांचे होते. अमरदास भल्या पहाटे उठून नदींवर स्नानास जात, येताना पाण्याचे घागर भरून आणत व त्या पाण्याने स्वहस्ते श्री गुरू अगंद देवांना स्नान घालत. त्यांची सर्व तो परी सेवा करीत. प्रार्थाना, घराची झाड-लोट, लंगरमधील सेवा सर्व काही करत. कोणतेही काम त्यांना हलके वाटले नाही. त्याच बरोबर ते गुरू कडून उपदेश प्राप्त करून आपली अध्यात्मिक ऊंची ही वाढवत होते. असा सेवेचा दहा वर्षांचा काळ उलटला. अमरदासांची योग्य अध्यात्मिक प्रगती झाली आहे ह्याची खातरजमा झाल्यावर व आपली परलोकी जाण्याची वेळ जवळ येऊन ठेपली आहे हे जाणून श्री गुरू अंगद देवांनी अमरदासांना गुरू पदी स्थापित केले. अशा रीतीने वयाच्या सत्तराव्या वर्षी अमरदास हे श्री गुरू अमरदास म्हणून शीखांचे तिसरे गुरू झाले व दुर्गादासांची भविष्यवाणी खरी ठरली.

**गोविंदवाल शहर वसवले**

चौधरी गोविंद खत्री ह्या व्यापाऱ्याची खूप मोठी जमीन व्यास नदी तीरी होती त्या ठिकाणी एक नगर वसवण्याचा तो प्रयत्न करत होता पण घरे बांधली की एका रात्रीत ती भुई सपाट होत. ही भुताटकी आहे असा सर्वांचा समज होता. तो श्री गुरू अंगद देवांकडे आला व त्यांच्या चरणी लीन होऊन त्यांच्या मदतीची याचना केली. श्री गुरू अंगद देवांनी आपला मुलगा दासू यास गोविंदाच्या मदतीस जाण्यास सांगितले पण भूतांच्या भीतीने त्याने तेथे जाण्यास नकार दिला. मग श्री गुरू अंगद देवांनी ही कामगिरी अमरदासांवर सोपवली. ते ही गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानून निशंक मनाने चौधरी गोविंद खत्रीच्या मदतीस गेले. श्री गुरू अंगद देवांनी अमरदासांचे हाती एक छडी देऊन पूर्व दिशेने नगर निर्माणाचे काम सुरू करण्याबद्दल सांगितले. अमरदास यांनी त्याप्रमाणे केले व गोविंदावाल नगरची निर्मिती केली. चौधरी गोविंद खत्रीने निम्मी जमीन गुरू चरणी समर्पित केली. श्री गुरू अमरदास यांनी गुरूपद ग्रहण केल्यानंतर गोविंदवाल शहरी आपले वास्तव्य केले.

श्री गुरू अंगद देवांच्या आदेशानुसार श्री गुरू अमरदास गोविंदवाल शहरी कायम वास्तव्यात आले पण त्यांनी काही दिवस अज्ञानवास करण्याचे ठरवले व आपल्या मूळ गाव बसारके मध्ये एका अज्ञात घरात एकांत वासात गेले. बहूदा भावी कालाच्या कार्य योजनेचा तपशील त्यावेळी त्यांनी ठरवला असावा.

**राजा हरीचंदाची कथा**

अज्ञानवासातून श्री गुरू अमरदास गोविंदवालला परत आले. नेहमी प्रमाणे कीर्तंन, प्रवचन, सतसंग आदि कार्य क्रम सुरू झाले. लंगर सुरू झाला. सगळी कडून शीख भक्त गोविंदवालला गुरू दर्शनार्थं येऊ लागले. पण त्यांच्या राहण्याची व्यवस्था अपुरी पडू लागली म्हणून श्री गुरू अमरदासांनी आपला पुतण्या भाई सावन ह्यास इमारती लाकडे आणण्यासाठी जवळच्या हरीपूरच्या डोंगरी राजा हरीचन्दकडे रूमाल (त्याकाळी पत्र रूमालात बांधून पाठविण्याचा प्रघात होता) देऊन पाठवले.

भाई सावन हरीपूरला पोहोचला. त्या दिवशी एकादशी होती त्या राज्यात एकादशीच्या दिवशी सर्वजण उपवास करत. कोठे ही चूल पेटत नसे. भाई सावनला भूक लागली होती त्याने लाकडे पेटवून आपले भोजन शिजवले. राजाच्या सेवकांनी त्यास पकडून तुरूंगात टाकले. इकडे राजाचा मुलगा एकाएकी आजारी पडला. राज वैद्याने खूप प्रयत्न केले पण आजारास उतार पडेना. कोणी तरी राजास सांगितले की गुरू अमरदासांच्या दुतास बंदी केल्यामुळेच हे अरीष्ट ओढवले आहे. भाई सावन यांस मुक्त करू राजा पुढे उभे करण्यात आले व त्यास सर्व हकिगत सांगण्यात आली. त्याने श्री गुरू

अमरदासांचे स्मरण केले व रूमाल राजकुमाराच्या देहावरून फिरवला आणि काय आश्चर्य राजकुमार खडखडीत बरा झाला. राजाने क्षमा मागितली व लाकडे रवाना केली व श्री गुरू अमरदासांच्या दर्शनाची इच्छा व्यक्त केली. भाई सावन ने त्यांना सांगितले की गुरूदेव कोणासही केंव्हाही दर्शन देतात. पण शीख धर्मात स्त्रिया बुरखा घेत नाहीत. गुरू दर्शन घेताना त्यांना बुरखा दूर करावा लागतो. राजा हरीचंद आपल्यासर्व राण्यासमवेत गुरू दर्शनास गेला पण एक राणी मात्र तोंडावर बुरखा घेऊन गुरू देवांसमोर गेली. गुरू देवांच्या तोंडून सहज उदार निघाले की, ''ही कोण वेडी येथे आली आहे ? तिला जर माझे दर्शनच घ्यावयाचे नव्हते तर ती येथे आलीच कशाला ?'' ह्या शब्दाबरोबर ती राणी खरोखरच वेडी होऊन जंगलात पळून गेली.

**भाई सच निसचची कथा**

भाई सचनिसच (सत्यवचनी) हा लाहोर जिल्ह्यातील मदरका गावचा रहिवासी होता तो उत्तम वैद्य होता पण त्यास 'हजीरा' नावाची दुर्धर व्याधी जडली जी कोणी ही बरी करू शकत नव्हते. तो श्री गुरू अमरदासांचा एक निष्ठ भक्त होता. एकदा तो इतर भक्तांबरोबर गुरू दर्शनार्थ गोविंदवालला आला, दर्शनाचे वेळी त्याच्या शरीराचा श्री गुरू अंगदांच्या खडावास स्पर्श झाला. सचनिसचा रोग नष्ट झाला. तो पूर्ववत सुदृढ झाला आता तो कायम गुरू सेवेत गोविंदवाल येथे स्थाइक झाला.

एकदा सचनिसच जंगलात लाकडे तोडण्यासाठी गेला असता एक वेडी विक्राळ हास्य करत त्याच्या पुढे येऊन उभी राहिली. भीतीने तो गर्भगळीत झाला. हातातील कुऱ्हाड गळून पडली त्याच्या. त्या वेडीने सचनिसचला जमिनीवर आपटून ती पळून गेली. सचनिसच घाबरून पळत गोविंदवालला आला व त्याने घडलेली सारी हकिगत श्री गुरू अमरदासांना सांगितली.

दुसऱ्या दिवशी जंगलात जाताना त्याने श्री गुरू अमरदासांकडे त्यांची एक खडाव मागून घेतली व त्यासह तो जंगलात गेला एक ठिकाणी ती वेडी बसली होती. तो चटकन तेथे गेला व त्याने त्या वेडीच्या शरीरास गुरूदेवांच्या खडावाचा स्पर्श केला. त्या स्पर्शा बरोबर वेडीचे वेड दूर पळाले व ती चांगली झाली. तिला घेऊन तो श्री गुरू अमरदासांकडे आला. ती स्त्री गुरूदेवांना शरण गेली गुरूदेवांनी तिल सुंदर वस्त्रे देऊन तिचा विवाह सचनिसचशी करून दिला व त्याला दुसरी ही खडाव दिली व दोघे मिळून चांगला संसार करा असा आशिर्वाद दिला.

**दतूचे उर्मट वर्तन**

श्री गुरू अमरदासांना श्रीगुरू अंगददेवांनी गुरू पद दिले ही गोष्ट श्री गुरू अंगद देवांचा मुलगा दतु ह्यास मुळीच आवडली नाही. लोकांनी आपणास गुरू मानावे असे त्यास वाटत होते. पण लोक अमरदासांनाच गुरू मानत आणि त्यांचा लौकिकही दिवसेंदिवस वाढतच होता. हे सहन न होऊन एक दिवस दतू गोविंदवालला आला. श्री गुरू अमरदास आपल्या व्यासपीठावर बसले होते. तेथे येऊन त्याने गुरूदेवांच्या छातीवर जोराने लाथ मारली. पण श्री गुरू अमरदास शांतपणे म्हणाले ''अरेरे, ह्या माझ्या म्हाताऱ्या हाडांनी आपल्या पायास इजा तर झाली नाही ना ?'' दातू शरमिंदा होऊन निघून गेला.

**भाई पारो जुल्का**

भाई पारो जुल्का हा श्री गुरू अमरदास यांचा एकनिष्ठ भक्त होता. तो कपूरथला जिल्ह्यातील उल्ला गावाजा राहणारा. तो उल्लाहून रोज व्यास नदी ओलांडून गोविंदवाल ला गुरू दर्शनासाठी येत असे. वादळ वारा, पाऊस थंडी काहीही असो त्याचा हा नेम चुकला नाही.

असाच एकदा व्यास नदीला पूर आला होता जालंदरचा हकीम अबदुल्ला पाणी ओसरण्याची वाट पहात आपल्या फौजेसह थांबून राहिला होता. तेव्हढ्यात भाई पारो आपल्या घोड्यावरून तेथे आला. त्याने आपला घोडा बेधडक पुरात

घातला व नदी पार करून गेला. हकीम अबदुल्ला हे आश्चर्याने पहात होता. काही वेळाने भाई पारो जसा गेला तसाच पूरातून पाणी कापत परत ही आला. हकीम अबदुल्लाने त्यास थांबवले व विचारले, ''तू कोठे गेला होतास ? तुला पूराची भीती वाटली नाही ?'' भाई पारो उत्तरला, ''भीती कशाची ? मी रोज गुरू दर्शनास जातो माझे गुरू श्री गुरू अमरदास माझे रक्षण करतात.'' अबदुल्ला अचंबित झाला त्याने ही श्री गुरू अमरदासांच्या दर्शनाची इच्छा प्रकट केली. भाई पारो म्हणाला, ''माझ्या गुरूदेवांचे स्मरण करा व माझ्या मागोमाग आपला घोडा पुरात घाला. श्रध्दा ठेवा श्रीगुरूदेव आपणास तारून नेतील. त्याप्रमाणे त्याने भाई पारो पाठोपाठ घोडा पाण्यात घातला व नदीपार करून श्री गुरू अमरदासांचे चरणी लीन झाला. व त्याने सर्व काम सोडून गुरू सेवेत रममाण झाला. त्याची ईश्वर निष्ठा पाहून त्याचे नाव ''अल्लारयार'' असे ठेवण्यात आले व भाई पारोस श्री गुरू अरजन देवांनी परमहंस ही पदवी प्रदान केली.

श्री गुरू अमरदासांनी अल्लार यास मंजी बहाल केली, भाई परोसही ते मंजी देऊ इच्छित होते. पण त्याने ती नम्रपणे नाकारली व तो गुरू सेवेत रममाण झाला.

### धर्मप्रसार व धर्म संघटन, मंजी पद्धत

श्री गुरू अमरदासांची कीर्ती चौदिशात पसरली. लोक दूर दूरहून त्यांच्या दर्शनार्थ गोविंदवालला येऊ लागले त्यांना जागेवरच मार्गदर्शन व्हावे व धर्माचा अधिक प्रचार व प्रसार व्हावा म्हणून श्री गुरू अमरदासांनी बावीस ठिकाणी धर्मपीठे स्थापन केली. त्यांना 'मंजी' असे म्हणत. प्रत्येक पीठावर त्यांनी आपला एक प्रतिनिधी नियुक्त केला त्यास 'मसंद' म्हणत. ते लोकांना शीख धर्माची दीक्षा देत श्री गुरू अमरदासांनी 'दस वंद' पद्धत ही सुरू केली 'दस वंद' म्हणजे दहाव्या हिस्सा सर्व शीखांनी आपल्या कमईचा दाहवा हिसा धर्म कार्यात द्यावा असा आदेश दिला. प्रतीवर्षी वैशाख महिन्यात एक मेळवा भरविण्यास त्यांनी सुरवात केली. पुढे पुढे वर्षातून तीन वेळा हे मेळावे भरू लागले वैशाख, दिवाळी व माघ महिना अशा तीन वेळा या यात्रा भरत त्यावेळी दसबंधची रक्कम लोक श्री गुरूदेवांना अर्पण करत. पुढे हे काम मसंदांमार्फत होऊ लागले पण मसंदास सक्त ताकीद होती की त्यांनी ह्या दसबंध पैकी एक पैसा ही स्वत:कडे ठेऊन घ्यायचा नाही किंवा स्वत:साठी खर्च करावयाचा नाही.

श्री गुरू अरजन देवांनी काही स्त्रीयांचीही मसंद पदी नियुक्ती केली. त्यांना 'पिराह' म्हणत. श्री गुरू अमरदासांनी उचललेले हे एक क्रांतिकारक पाऊल होते.

### कुष्ठरोगी प्रेमा

लाहोर जिल्ह्यात खारी गावात प्रेमा नावाचा एक अनाथ मुलगा होता त्याला कुष्ठ रोग झाला त्यामुळे कोणी ही त्याच्या जवळ येईना त्याला खावयास अन्न मिळेना. त्याने श्री गुरू अमरदासांची कीर्ती ऐकली होती. तो खुरडत खुरडत गोविंदवाल ला येऊन पोहोचला. श्री गुरू अमरदासांनी खोदलेल्या बावडी जवळ जाऊन बसला. तथे त्यास कोणी लंगरमधील अन्न आणून देई. त्याच्या कानावर श्री गुरू अमरदासांची वाणी पडे. ती तो कंठस्थ करी व दिवसभर ती गात राही. श्री गुरू अमरदासांचे शिष्य जेव्हा विहीरीवर येत तेव्हा त्यांची चरण धूळ तो आपल्या मस्तकी धारण करी. अशी त्याची साधना चालू होती.

एके दिवशी शिष्यांनी कुष्ठरोगी प्रेमाची हकीगत गुरूजींच्या कानावर घातली. श्री गुरू अमरदासांनी त्यास बोलवून घेतले व स्वत:च्या हातानी त्यास उचलून पाटावर बसवले व त्यास स्वहस्ते आंघोळ घातली. व त्यास सुंदर कपडे घातले. असे काही दिवस चालले. लवकरच प्रेमाचा कुष्ठरोग बरा झाला व तो एक सुंदर व सुदृढ युवक झाला. जणू त्याचा काया कल्पच झाला. त्याचे नाव मुरारी ठेवले.

एक दिवस श्री गुरू अमरदासांनी संगत समोर प्रश्न विचारला, ''ह्या माझ्या मुलाला कोण आपली मुलगी देईल ?'' सारी सभा स्तब्ध झाली कारण पूर्वी का होईना ज्यास कुष्ठ रोग होता त्यास आपली मुलगी कोण देणार ? पण एक वृद्ध शिष्य

उभा राहीला व म्हणाला, ''मी माझी मुलगी मथुरा त्याला देतो'' पण हे शब्द ऐकताच त्याची पत्नी म्हणाली, ''माझ्या नवऱ्याला वेड लागले आहे. मी माझी मुलगी अशा मुलाला मी मुळीच देणार नाही. त्याला ना जात ना पात ना कूल ना शील! अशा मुलाला मुलगी देवून मी तिच्या आयुष्याचा मुळीच खेळ खंडोबा होऊ देणार नाही.'' श्री गुरू अमरदास म्हणाले. हे माते असा त्रागा करू नकोस. मुरारीस मी माझा मुलगा मानतो म्हणजे माझे कुल शील तेच त्याचे. देवी मुरारी व मथुरा यांचा विवाह स्वर्गातच ठरला आहे. उगाच त्यात अडथळा आणू नकोस'' गुरूदेवांचे ते शब्द ऐकून ती शांत झाली मुरारी व मथुरा यांचा विवाह झाला. अशा रीतीने श्री गुरू अमरदासांनी एका कुष्ठ रोग्याचा केवळ रोगच बरा केला असे नव्हे तर त्यास समाजात सुप्रतिष्ठीत केले केवढे हे महान क्रांतीकारी कार्य!

**भाई लंगाह**

पंजाबी भाषेत 'लंगाह' म्हणजे लंगडा. श्री गुरू अमरदासांचा एक लंगडा शिष्य होता तो तलवंडी येथील रहाणारा होता तो श्री गुरू अमरदासांचा एक निष्ठ शिष्य होता. तो रोज गुरू देवांसाठी सकाळी न्याहरी करता दही घेऊन येत असे. व गुरू देव ही त्याच्या दह्याशिवाय न्याहरी करत नसत. तो ही कुबडी घेऊन तलवंडीहून तीन मैल गोविंदवालला रोज येत असे. पण तलवंडी गावच्या चौधरीस हे आवडत नसे. एक दिवस लंगाह दही घेऊन गोविंदलालला जात असता चौधरीने त्यास अडवले व त्याची कुबडीच काढून घेतली. आता लंगाहला चालणे अशक्य झाले पण गुरूदेवांना वेळेत दही पोचवण्याची इच्छा त्यास स्वस्थ बसू देईना. त्याने तेथेच पडलेले एक वाळके लाकूड घेतले व रखडत रखडत गोविंदवाल कडे निघाला.

इकडे गुरूदेवांच्या न्याहरीस उशीर होत आहे असे पाहून इतर शिष्यांनी त्यांना दही आणून दिले. पण गुरू देवांनी ते घेण्याचे साफ नाकारले व लंगाहची प्रतिक्षा करत बसले. अखेर कसा बसा लंगाह गोविंदवालला श्री गुरू अमरदासांपुढे येऊन पोहोचला व उशीर होण्याचे कारण ही त्यांना सांगितले. श्री गुरू देवांनी सर्व हकिगत ऐकली व म्हणाले, ''आता मला तुझा पाय नीट करावाच लागेल. असे कर असाच लाहोरला जा. तेथे शेख हुसैन नावाचा सुफी संत आहे. त्याच्या कडे जा. त्याला तुझी सारी हकीगत सांग. तो तुझा पाय नीट करील.

लंगाह लाहोरला गेला शेख हुसैन खूप संतापला व त्याने लंगाहास खूप वाईट वाईट शिव्या हासडल्या व येथून निघून जा असे ही सांगितले. येवढेच म्हणून तो थांबला नाही तर हाती छडी घेऊन लंगाहला मारू लागला, आता प्राण भयाने लंगाह पळू लागला. आणि काय आश्चर्य, लंगाहचा मोडका पायही जमिनीस टेकला व तो दोनही पायांनी जोराने पळू लागला. आता मागे हुसैन नाही हे पाहून तो थांबला व एकदम त्याच्या लक्षात आले की आपला पाय ठीक झाला आहे. त्यास खूप आनंद झाला. तो पळत पळत सुफी संत हुसैन यांच्या डेऱ्यात आला त्याने त्यांचे पाय धरले हुसैन यांनी त्यास उठवून आपल्या हृदयाशी धरले व म्हणाले, ''अरे तुझा पाय तर तुझ्या गुरूनेच बरा केला आहे. त्याचे पाय धर. मी केवळ निमित्य मात्र आहे.

लंगाह आत गोविंदवाल परत आला. त्याने घडलेली सारी हकीगत श्री गुरू अमरदासांच्या कानावर घातली व त्यांना थेट प्रश्न केला की, ''गुरूदेव जर तुम्हीच पाय दुरूस्त केलात तर मला हुसैन यांच्या कडे पाठवलेच कशाला?'' गुरूदेव म्हणाले, ''अरे वेड्या तुझा पाय न मी बरा केला न हुसैनने. ही सारी त्या प्रभू परमात्म्याची कृपा आहे. सारे काही करणारा करवणारा कर्ता पुरुष तो प्रभू परमात्मा आहे त्याच्या वर पूर्ण विश्वास ठेव. त्याचे स्मरण कर''

**श्री गुरू अरजनदेव व बादशहा अकबर**

श्री गुरू अमरदास यांची वाढती लोकप्रियता पाहून व शीख धर्म विचाराचा वाढता प्रभाव पाहून सनातनी लोकांचे पित्त खवळले. त्यावेळी अकबर बादशाहा लाहोर येथे मुक्कामास होते. सनातनी लोकांनी श्रीगुरू अरजन देवांवर खोटे नाटे आरोप करून तो हिंदू धर्म नष्ट करावयास निघाला आहे त्यास शासन व्हावे असा अर्ज अकबराकडे दिला. अकबराने श्री गुरू अमरदास यांना लाहोरला येण्यास सांगितले. त्यास उत्तर म्हणून ''मी वृद्ध आहे. मला चालवत नाही म्हणून क्षमा

असावी मी माझा जावई श्री रामदास ह्यास पाठवत आहे. तो आपल्या सर्व प्रश्नांची उत्तरे देईल.'' असे कळवले. त्याप्रमाणे श्री रामदास अकबरा पुढे उपस्थित होऊन त्यांनी सनातन्यांचे सर्व आरोप सप्रमाण खोडून काढले अकबर संतुष्ट झाला व त्याने सनातन्यांचा अर्ज फेटाळून लावला.

काही दिवसांनी स्वत: अकबर गोविंदवालला श्री गुरू अरजन देवांच्या दर्शनासाठी आले प्रथम ते लंगरमध्ये पोहोचले. तथे सर्व लोक सर्व भेदभाव विसरून भोजन करताना पाहून तो संतुष्ट झाला. तेथून तो श्री गुरू अरजन देव जेथे प्रवचन करत होते तेथे आला. इतरांप्रमाणेच जमिनीवर बसून त्याने श्री गुरू अरजन देवांचे प्रवचन ऐकले. त्यांचे विचार ऐकून तो अत्यंत प्रभावित झाला. त्याने लंगरसाठी जहागीर देण्याचा मानस व्यक्त केला पण श्री गुरू देवांनी त्यास नम्रतापूर्वक नकार दिला व सांगितले की लंगर भक्तीच्या समर्पणातूनच चालवण्याचा आपला प्रघात आहे. अकबर ह्या उत्तराने अधीकच प्रभावित झाला व त्याने वैशाखी यात्रेसाठी दरवर्षी एक लाख वीस हजार रूपये पाठविण्यास सुरवात केली.

**श्री गुरू अमरदासांच्या रचना –**

श्री गुरू अमरदास हे अत्यंत प्रतिभाशाली झाली कवी होते. श्री गुरू अरजनदेव व श्री गुरू नानक देवांनंतर त्यांच्या सर्वात जास्त म्हणजे ९०७ रचनांचा समावेश श्री गुरू ग्रंथ साहिबामध्ये समाविष्ट केलेल्या आहेत. त्यांची सर्वात महत्वाची रचना म्हणजे 'अनंद' ह्यासच आदराने 'श्री अनंदु साहिब' असे ही म्हटले जाते.

श्री गुरू अमरदासांची आणखी एक महत्वाची रचना म्हणजे 'सद' ही रामकली रागात आहे. ह्यात श्री गुरू अमरदासांनी आपल्या अंतसमयी शिष्यांनी केलेला उपदेश ग्रथित केला असून मृत्यू ही दु:ख करण्याची घटना नसून तो आनंद सोहळा आहे असे प्रतिपादन केले आहे. हा उपदेश बाबा सुंदरजींनी लिहून घेतला तो श्री गुरू ग्रंथ साहिब मध्ये समाविष्ट आहे.

**गुरू उपदेशाचे संकलन**

श्री गुरू अमरदासांचे आणखी एक महत्वाचे कार्य म्हणजे त्यांनी केलेले गुरू उपदेशाचे संकलन त्यांनी श्री गुरू नानक देव, श्री गुरू अंगद देव व इतर भक्तांची पदे संकलित करून एक पोथी तयार केली त्याला 'मोहन बीड' असे म्हटले जाते. पुढे श्री गुरू अरजनदेव यांना आदीग्रंथ संकलित करताना ह्याचा फार मोठा उपयोग झाला.

आपला परलोक गमनाचा दिवस जवळ आला आहे ह्याची श्री गुरु अमरदास यांना जाणीव झाली. त्यांनी सर्व शीखांना एकत्र केला व आपला धाकटा जावई जेठा म्हणजेच रामदास यांस गुरुपदी विराजमान केले. दि. १ सप्टेंबर १५७४ रोजी वयाच्या ९५ व्या वर्षी श्री गुरु अमरदास परतत्त्वात विलीन झाले.

**समारोप :**

**घनहर बूंद बसुअ रोमावाली कुसम बसंत गनंत ग आवै ।।**
**रवि रासि किरणि उदरु सागर को गंग तरंग अंतु को पातै ।।**
**रुद्र धिआन गिआन सतगुरु के कविजन भव्य उनह जो गावै ।।**
**भले अमरदास गुण तेरे ?? उपमा तोंहि बनि आवै ।।१ ।।२२ ।।** (श्री. गु. ग्रं. सा. १३९६)

**अर्थ –** मेघातून बरसणारे जलबिंदु, पृथ्वीवर उगवणाऱ्या वनस्पती, वसंत ऋतूत फुलणारी यांची कोणासही गणती करता येत नाही. सूर्य, चंद्र यांची किरणे, सागराची विशालता, गंगेच्या पाण्यावर उठणारे तरंग यांचा ही अंत कोणास लागत नाही. सतगुरूचा सेवक भल्ल सांगतो की, कोणी रूद्राप्रमाणे समाधी लाऊन बसला, त्याने सर्वज्ञान प्राप्त केले तरीही त्यास श्री गुरु अमरदासांची महती पूर्णांशाने सांगता येणार नाही. गुरुदेव आपूले गुण अपार आहेत. अनुममेय आहे. श्री गुरु अमरदास हे त्यांच्याचसारखे आहेत. त्यांचा सारखा अन्य कोणीही नाही.

◆ ◇ ◆

# परिशिष्ट – २

## श्री गुरू रामदास यांचे संक्षिप्त चरित्र

श्री गुरू अमरदास यांच्यानंतर श्री गुरू रामदास हे शिखांचे चौथे गुरू होत.

**जन्म व बालपण -**

श्री गुरु रामदासांचा जन्म 'चुना मंडी' ह्या गावी झाला. त्याच्या आईचे नाव माता अनु व वडलांचे नाव बाबा हरीदास सोंठी असे होते. रामदास ला एक लहान भाऊ व एक लहान बहीण होती. तो सर्व भावंडात मोठा होता. म्हणून त्यास जेठा म्हणत व तेच त्याचे नाव रूढ झाले. रामदास दिसावयास अत्यंत सुदंर व हसतमुख होता. तो अतिशय धीट व इतर मुलांशी मिळून मिसळून वागणारा होता. लहानपणा पासूनच त्यास ईश्वरभक्तीची आवड होती. मुलांना एकत्र जमवावे व प्रभू भक्तीची गीते गावीत हा त्याचा छंद होता. कोणी साधु पुरूष भेटल्यास त्याला आपल्या घरी घेऊन यावे, जेऊ खाऊ घालावे, त्यांची मनोभावे सेवा करावी हा त्याचा आवडता छंद होता.

अशातच काळ चालला होता पण एके दिवशी त्याच्या वर आकाशीची कुऱ्हाडच कोसळली. त्याचे माता व पिता अकस्मात हे जग सोडून गेले. रामदास व त्याच्या भांवडाचे कृपा छत्रच हरपले. त्यावेळी त्याचे वय अवघे सात वर्षाचे होते. तो मोठा असल्याने आपल्या लहानग्या भावंडाचे संगोपन करण्याचे दायीत्व ही त्याच्यावरच येऊन पडले. पण तो डगमगला नाही. त्याच्या आजोबांना हे वृत्त कळताच ते त्या तीन मुलांना बासर येथे आपल्या घरी घेऊन आले. पण त्यांचीही आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. त्यामुळे प्रंपचाला हातभार लावण्यासाठी रामदास चणे फुटाणे विकु लागला. बासर गावात तलावाच्या काठी पिंपळाच्या झाडाखाली तो टोपली घेऊन चणे फुटाणे विकत असे. त्याच्या लाघवी बोलण्याने व विनम्र वागण्याने त्याचे चणे हातोहात खपत.

बासर गावाच्या जवळच श्री गुरू अमदासजी गोइंदवाल शहर वसवत होते. तेथे धंदा जोरात चालेल असे जाणून रामदास तेथे जाऊ लागला. श्री गुरू अमरदासांच्या घरासमोरच तो आपली चण्यांची टोपली घेऊन बसु लागला. त्यावेळी तो बारा वर्षांचा होता.

एकदा श्री गुरू अमरदास व त्यांची पत्नी मनसा देवी यांचे लक्ष चणे फुटाणे विकणाऱ्या रामदास कडे गेले. त्याच्याकडे पाहून माता मनसा देवी म्हणाल्या. ''किती सूंदर आहे हा मुलगा व खुप कष्टाळू ही दिसतो. अमरदासनां ही तो आवडला. त्यांनी त्यास बोलावून त्याची चौकशी केली. त्याची हलाखीची परीस्थिती पाहून त्यांनी त्यास आपल्याकडे आश्रय दिला.

रामदास 'श्री गुरू अमरदासांची मनोभावे सेवा करू लागला. त्याचा विनयशील स्वभाव, सेवावृत्ती, कष्ट करण्याची तयारी व ईश्वर शरणता पाहून माता मनसा देवी व श्री गुरू अमरदास त्याच्यावर प्रसन्न झाले व त्यांनी आपली कन्या भानी हिच्याशी त्याचा विवाह करून त्यास आपला जावई करून घेतले. जावई झाल्यानंतर ही रामदास आपला चणे विकण्याचा धंदा करतच राहिले.

सकाळी लवकरच उठावे, गुरूची सेवा करावी, ईश्वर भजनात रममाण व्हावे व आपला धंदा इमानदारीने व कष्टपूर्वक करावा असा त्याचा दिनक्रम असे. एक दिवस श्री गुरू अमरदासांनी त्यास जवळ बोलावून विचारले की, ''तु कोणती इच्छा मनात धरून येथे येतोस ?'' रामदास उत्तरले,''मी साऱ्या इच्छा आकांक्षा सोडून येथे आलो आहे.''

त्यांचे हे उत्तर ऐकून श्री गुरू अमरदास प्रसन्न झाले, शिष्य असावा तर असा.

**अकबर व रामदास**

काही हिंदूंनी श्री गुरू अमरदासांचे विरूद्ध अकबराकडे तक्रार केली की ते हिंदू धर्माची निंदा नालस्ती करत आहेत.

अकबराने श्री गुरू अमरदासांना समक्ष दरबारात उपस्थित राहाण्यास सांगितले. अमरदासांनी आपल्या वृद्धत्वाची सबब सांगून रामदासांना श्री गुरू अमरदांसानी अकबराचे दरबारी पाठवले. रामदासाने ही उत्तम युक्तीवाद करून हिंदूच्या तक्रारीतील फोलपणा अकबरास पटवून दिला. बोलण्याच्या ओघात 'वाहिगुरू' हा शब्द रामदासाच्या तोंडून आला अकबराने त्याचा अर्थ विचारला, तेव्हा रामदास उत्तरले, ''महाराज 'वाहिगुरू' हा ईश्वरवाचक शब्द आहे. वासुदेव, हरि, गोविंद व राम ह्यांचे एकत्रीत रूप म्हणजे 'वाहिगुरू'.'' ही तर सारी हिंदू देवतांचीच नावे आहेत हे अकबरास माहित होते. त्यामुळे हिंदूंचा दावा खोटा असल्याची बादशहाची खात्री पटली. त्याने रामदासांचा सत्कार करून पाठवणी केली. त्यांच्या ह्या यशाने श्री गुरू अमरदास रामदासवर प्रसन्न झाले.

**रामदासांची गुरूपदी नियुक्ती**

श्री गुरू अमरदासजी यांना आपले कार्य पूर्ण झाले आहे व आपल्या मूळ स्थानी परमात्म्याकडे परत जाण्याची वेळ झाली आहे ह्याची जाणीव झाली (रामदास). एकच काम शिल्लक उरले होते ते म्हणजे पुढील गुरूची नियुक्ती करणे.

श्री गुरू अमरदास चे दोघे जावई भाई जेठा - व भाई रामा हे श्री गुरू अमरदास यांचे एकनिष्ठ अनुयायी होते. व सर्वच जण त्यांना महान गुरू सेवक म्हणून ओळखत होते. दोघेही गुरू पदी विराजमान होण्यास पात्र होते. कोणास गुरूपदी नियुक्ती करावे हा श्री गुरू अमरदासांपुढेही प्रश्नच होता. त्यांनी दोघांची परीक्षा घेण्याचे ठरविले. ते दोघांना मैदानात घेऊन गेले व त्यांना सत्संगासाठी दोन चौथरे बांधण्यास सांगितले. संध्याकाळी गुरूदेव आले. त्यांनी चौथरे तपासले, ते नापसंत केले व दुसरे परत बांधण्यास सांगितले असे चार पाच वेळा झाले अखेर भाई रामा कंटाळले त्यांनी गुरू रामदासांना सांगितले, ''आता पुरे झाले, तुम्हाला काहीच पसंत पडत नाही मी आता परत चौथरा बांधणार नाही.'' श्री गुरू अमरदास जेठाकडे गेले. त्याने बांधलेला चौथरा पाहीला, नापास केला व नवा बांधण्यास सांगितला. भाई जेठाने नम्रपणे त्यांना वंदन केले व म्हणाला, ''गुरूदेव तुम्हाला पसंत पडेल असा चौथरा बांधण्यास यशस्वी होईन असा मला आर्शिवाद द्या. मी उद्या परत चौथरा बांधून दाखवीन.'' श्री गुरू अमरदासांना भाई जेठाचे उत्तर ऐकून प्रसन्न झाले. त्यांनी मनोमन भाई जेठास गुरूपदी नियुक्त करण्याचे ठरवले.

दुसऱ्या दिवशी त्यांनी आपल्या शिष्यांना एकत्र केले. भाई जेठास आपल्या हाताने स्नान घातले त्यास नवीन वस्त्रे परिधान करावयास दिली व त्यास गुरू पदी विराजमान केले. बाबा बुढाजीने भाई जेठाच्या भाळी केशरी टिळा लावला. श्री गुरू अमरदासजींने त्याचे 'श्री गुरू रामदास' असे नामाभीधान केले. त्याचे पुढे पाच पैसे व नारळ ठेऊन त्यास नमस्कार केला. याचे भोवती प्रदक्षिणा घालून ते आजपासून सिख्खांचे चौथे गुरू झाल्याने जाहीर केले. त्यानंतर सर्वच जण श्री गुरू रामदास यांचे चरणी लीन झाले व त्यांनी त्यांचा गुरू म्हणून स्वीकार केला.

**रामदास चक्कची निर्मिती**

गुरूपदी नियुक्ती करण्यापूर्वी श्री गुरू अमरदासजी रामदासना घेऊन अशा जागी येऊन पोहोचले की जेथे श्री गुरू नानक देव एकदा आले होते व ''ह्या ठिकाणी भावी काळात एक नवीन शहर वसेल की जे शीखांचे तीर्थस्थान होईल'' अशी भविष्यवाणी उच्चारली होती. तेथे पोहोचल्यावर त्यांनी आजूबाजूच्या गावातील जमीनदारांना बोलावून आपली इच्छा बोलून दाखवली. सर्वजणांनी त्यास मान्यता दिली व श्री गुरू अमरदासांनी ती जमीन खरेदी केली व रामदासांना तेथेच ठेऊन गोविंदवालला परतले.

रामदासांनी गुरूच्या आज्ञेप्रमाणे शहर वसवण्याच्या कामास प्रारंभ केला प्रथम त्यांनी आपल्या निवासासाठी एक

भवन बांधले पुढे त्यास 'गुरू का महल' असे म्हटले जाऊ लागले. त्यानंतर बाजार वसविण्यात आला त्याला 'गुरू बाजार' असे म्हणू लागले. ह्या गोष्टी पूर्ण झाल्यावर श्री गुरू अमरदासांनी रामदास यांना गोविंदवालला बोलावून घेतले.

लवकरच रामदासांची गुरूपदी नियुक्ती करण्यास आली. श्री गुरू आज्ञेप्रमाणे श्री गुरूरामदास नव नगरीत येऊन राहिले.

शहर वाढावे त्यात सर्व प्रकारचे उद्द्योग सुरू व्हावेत म्हणून श्री गुरू रामदास यांनी अनेक सवलती देण्याचे जाहीर केले. त्याचा योग्य तो परिणाम होऊन एका आदर्श शहराची निर्मिती झाली. शहराचे नाव 'रामदास चक्क' असे ठेवण्यात आले.

**अमृत सरोवर**

'पट्टीकरचे' गावात दुनीचंद नावाचा एक श्रीमंत शेतकरी रहात होता. त्याला पाच मुली होत्या. त्यातील सर्वात लहान मुलगी रजनी, एकदा दुनिचंदने आपल्या सर्व मुलींना प्रश्न केला, ''मुलींनो, तुमचे पालनपोषण कोण करतो ?'' पहिल्या चारही जणींनी उत्तर दिले ''बाबा तुम्हीत आमचे पालनपोषण करता. तुमच्या शिवाय आम्हास दुसरा कोणताही आधार नाही'' रजनीने मात्र सांगितले, ''तो प्रभू परमात्माच सर्व जीवांचे पालन पोषण करतो. तोच सर्व जीवांचा आधार आहे. माझेही पालन पोषण तोच करतो'' दुनीचंदला ह्या उत्तराचा राग आला त्याचा अहंकार दुखावला गेला. त्याने पहिल्या चारही मुलींची लग्ने श्रीमंत मुलांबरोबर करून दिली व रजनीचे लग्न मात्र एका गरीब कुष्ठ रोग्याशी करून दिले पण रजनी डगमगली नाही. तिने आपल्या कुष्ठरोगी पतीस घेऊन रामदास चक्क गाठले. एका बोरीच्या झाडाखाली तिने एक झोपडी बांधून त्यात आपल्या पतीला ठेवले. तीची शीख गुरूंवर अपार श्रद्धा होती. ती गुरू घरी सेवा करू लागली व लंगरमधील अन्न आपल्या पतीसाठी नेऊ लागली. अशा प्रकारे ती आपली व पतीची गुजराण करत होती.

झोपडी समोर छोटासा जलाशय होता. एकदा एक नवल घडले. तो कुष्ठ रोगी तळ्याकाठी बसला होता. दोन कावळे भाकरीच्या एका तुकड्यासाठी भांडता भांडता त्या जलाशयात पडले आणि काय आश्चर्य त्या दोघांची शरीरे बगळ्या सारखी पांढरी शूभ्र झाली. कुष्ठरोग्याने ते पाहिले व त्याने ही तळ्यात बुडी घेतली. त्याचाही कायाकल्प झाला. आता तो कुष्ठरागी राहीला नाही. त्याचे रूपांतर एक सुदंर सुदृढ युवकात झाले होते. रजनी जेवण घेऊन आली. तिने तर त्यास ओळखलेच नाही. तरूणाने सर्व हकीकत सांगितली रजनी त्यास घेऊन श्री गुरू रामदास यांचे कडे गेली व त्यांना तिने सर्व हकिकत सांगितली. त्यांना आठवले की श्री गुरू नानकदेवांनी ह्या सरोवराचे आधीच भाकीत केले होते.

ते भाई बुढाजींना घेऊन तेथे गेले व विधीवत पूजा करून तेथे खोदकाम करून विस्तृत सरोवर निर्माण केले. तेच आजचे अमृत सरोवर किंवा अमृतसर. आजही शीख बांधवांची अशी श्रद्धा आहे की ह्या सरोवरात स्नान केल्याने शरीराच्या सर्व व्याधी व पाप धुवून जाते.

ह्या सरोवरात मध्यावर एक चबुतरा निर्माण करण्यात आला व तेथे श्री गुरू रामदासजी प्रात:काळी व सांयकाळी कीर्तन करत. त्याच जागेवर पुढे हरी मंदिराची उभारणी केली.

**अकबराची अमृतसर भेट**

अकबर काबूल मोहीमेवर गेला होता परत येताना त्याने अमृतसर शहराची ख्याती ऐकली व श्री गुरू रामदासांची ही ख्याती ऐकली. त्याला मागे दिल्लीस झालेल्या रामदासांच्या भेटीची आठवण झाली. श्री गुरू रामदास हे अत्यंत निस्पृह व निर्लोभी आहेत असे ही त्यांनी ऐकले होते. म्हणून दिल्लीला परतताना वाटेत ते अमृतसरला आले व श्री गुरूरामदास यांच्या भेटीस गेले. श्री गुरू रामदास यांनी त्यांना लंगरमध्ये प्रसाद ग्रहण करण्यास आमंत्रित केले. तेथे त्याने पाहिले की सर्व लोक

आपले सर्व भेद विसरून एकाच पंक्तीत बसून प्रसाद भक्षण करीत आहेत. त्याने ही सर्वांच्या पंक्तीत बसून प्रसाद ग्रहण केला. नंतर श्री गुरू रामदासांना एकशेएक मोहरा दिल्या. ते श्री गुरू रामदासांनी गोरगरिबांना वाटून टाकले. मग अकबराचे त्यांना बारा गावे इनाम देऊ केली. ती ही त्यांनी नम्रपणे नाकारली. श्री गुरू रामदास म्हणाले, ''आम्हा पकीरांना ह्या जहागिरीचा काय लोभ? उलट जहागिरी मुळे मनुष्याचा मनात काम क्रोध ईर्षा आदी विकार वाढीस लागतात व ते माणसास ईश्वरापासून दूर नेतात. आमचा आसरा एक प्रभू परमात्मा आहे.'' अकबरास कळून चुकले की श्री गुरू रामदास हे खरोखर निर्लोभी महापुरूष आहेत.

**बाबा श्री चंद यांची अमृतसर भेट**

बाबा श्रीचंद हे श्री गुरू नानकदेवांचे थोरले पूत्र वृत्तीने ते विरक्त होते. श्री गुरू अगंददेवीची गुरूपदी नियुक्ती झाल्यावर श्रीचंदाने संसाराचा त्याग करून ते विरक्त जीवन जगू लागले. त्यांनी भगवी वस्त्र धारण केली व ते अलगपणे शीख संप्रदायाचा प्रचार करू लागले त्यांच्या संप्रदायास उदासी पंथ म्हटले जाते.

अमृतसरची कीर्ती ऐकून त्यांना रहावले. नाही ते श्री गुरू रामदासांना भेटण्यासाठी अमृतसरला आले. त्यावेळी ते नव्वद वर्षाचे होते.

ते जेव्हा श्री गुरू रामदासांना भेटण्यासाठी रामदासांच्या दरबारात पोहोचले तेव्हा श्री गुरू रामदास आपल्या आसनावरून उठून बाबा श्रीचंदांना सामोरे गेले व त्यांच्या पायावर त्यांनी डोके ठेवले. बाबा श्रीचंद श्री गुरू रामदासांना प्रभामंडीत विलोभनीय मुखमंडलाकडे एकटक पहातच राहिले व अखेर उद्‌गारले,''वा तुम्हीतर फारच सूदंर व लांब दाढी वाढवली आहे'' श्री गुरू रामदास चटकन उद्‌गारले,''होय आपल्या सारख्या महापुरूषांच्या चरण कमलांवरील धूळ झटकण्यासाठीच ती आहे'' बाबा श्रीचंदजी श्री गुरू रामदासांच्या, विनम्रतेवर प्रसन्न झाले व म्हणाले ''श्री गुरू अगंददेवांनी आपल्या सेवा भावाने गुरूपद प्राप्त केले पण तुम्ही आपल्या सेवेने व विनम्रभावाने सारे जगच जिंकून घेतले आहे.'' जेव्हा बाबा श्रीचंद जावयास निघाले तेव्हा श्री गुरू रामदासांनी त्यांना नमस्कार करून पाचशे रूपये व एका घोडा अर्पण करून त्यांना निरोप दिला.

**भाई शोभा शाह**

अमृतसर मध्ये एक शोभा शाह नावाचा व्यापारी होतो. तो श्री गुरू रामदासांचा शिष्य झाला होता. त्यांची प्रवचने ऐकून शोभा शाह ही माया मोहापासून विरक्त झाला होता. तो आपल्या पोटापाण्यापुरता धंदा झाला की दुकान बंद करून श्री गुरू रामदासांची सेवा करण्यासाठी त्यांच्या दरबारात हजर होत असे.

एकदा श्री गुरू रामदास त्याच्या दुकानात गेले व त्यांनी त्यास विचारले, ''काय शोभा आज किती कमाई झाली ?'' शोभाने जमा झालेला सर्व गल्ला श्री गुरू रामदासांपुढे आणून ठेवला. श्री गुरू तो घेऊन गेले. असे सतत पाच दिवस चालले होते. सहाव्या दिवशी श्री गुरू रामदास येताच त्यांनी काही विचारण्या आधीच शोभा शाहने गल्ला श्री गुरू रामदासांच्या चरणी अर्पण केला. श्री गुरू रामदास अत्यंत प्रसन्न झाले त्यांनी त्याची मुलतानच्या 'मसंद' पदी नेमणूक केली.

**मसंद पद्धती**

श्री गुरू रामदासांच्या काळात शिख धर्माचा पंजाबात सर्वत्र चौफेर प्रसार झाला. त्यास सुसंघटीत स्वरूप येण्यासाठी श्री रामदासांनी जागोजागी मसंसाची नेमणूक केली. मसंद हा शीख धर्माचा प्रचारक असे. तो त्याची नियुक्ती झालेल्या

क्षेत्रात शीख धर्म विचारांचा प्रचार करी. धर्म कार्यार्थ निधी ही संकलित करीत. ह्या पद्धतीमुळे शीख धर्म अधिक सुसंघटित झाला आर्थिक दृष्टाही सबल झाला. शिख समाजात 'दसबंदी' प्रथा श्री गुरू अमरदारांनी सुरू केली होती तिलाही मसंद पद्धतीने बळकटी आली.

**वारसाची निवड**

श्री गुरू रामदासांना तीन पुत्र होत. थोरला पृथिया. हा अत्यंत लोभी वरकरणी गोड बोलणारा पण पाताळ यंत्री होता. श्री गुरु रामदासांना ही तो जुमानत नसे. दुसरा मुलगा बाबा महादेव. हा स्वभावाने कलंदर होता. आपल्याच मस्तीत तो दंग असे. त्याने विवाह ही केला नव्हता त्याला दुनियेशी, नात्यागोत्याशी काहीही देणे घेणे नव्हते. तिसरा मुलगा अरजनमल हा मात्र हुशार, कुशाग्रबुद्धीचा, शिघ्र कवी व विनयशील स्वभावाचा होता. त्यामुळे तो सर्वांनाच प्रिय होता. श्री गुरू रामदासांनी त्यासच गुरूपदी नियुक्त करण्याचा निर्णय घेतला. व योग्य समयी त्यास गुरूपदी विराजमान केले. व १ सप्टेंबर १५८१ रोजी त्यांचा आत्मा अनंतात विलीन झाला.

◆ ◇ ◆

## परिशिष्ट – ३

## श्री गुरू अरजन देव यांचे संक्षिप्त चरित्र

श्री गुरू अरजन देव हे, शीखांचे चौथे गुरू श्री रामदास यांचे तिसरे सुपुत्र व श्री गुरू अमरदास यांचे नातू (मुलीचा मुलगा) श्री गुरू अमरदासांची सुपुत्री बीबी भानी ही त्यांची आई. प्रिथीचंद व महादेव हे त्यांचे मोठे भाऊ.

**जन्म**

अरजन देवाचा जन्म १५ एप्रिल १५६३ (१९ वैशाख सवत १६२९) रोजी गोइंदवाल ह्या गावी झाला. अरजन देव याचा जन्म झाल्याची वार्ता ऐकून श्री गुरू अमरदास आपल्या नव्या नातवास पाहण्यासाठी त्यांच्या घरी गेले. बालक अरजन देवांचे तेजस्वी मुखंमडल पहाताच श्री गुरू अमरदास यांनी भविष्यवाणी उच्चारली की हा पुढे महान व्यक्ती बनेल व त्याची कीर्ती दिगंतरात पसरेल.

**बालपण व शिक्षण**

अरजन देव यांचे बालपण गोइंदवाल येथेच गेले. ते खेळावयास नेहमी आजोबांच्या (श्री गुरू अमरदास) घरीच असत. एकदा खेळतांना अरजन देवाचा चेंडू श्री गुरू अमरदास ज्या पलंगावर विश्राम घेत होते. त्या पलंगाखाली गेला. चेंडू काढण्यासाठी बाळ अरजन पलंगाखाली शिरला. चेंडू काढताना तो पलंग उचलला गेला. श्री गुरू अमरदास जागे झाले. त्यांच्या तोंडून सहज उद्‌गार बाहेर पडले.

**इह किहडा वड्डा पुरख है भारी ।**
**जिस मंजी हिलाई साड़ी सारी ।।**

अर्थ - ज्याने हा माझा पलंग गदगदा हलवला तो कोणीतरी बलवान महापुरुष असला पाहिजे.

आवाज ऐकून बिबि भानी तेथे पोहोचल्या. त्या म्हणाल्या, ''अहो बाबा हा 'किहडा' नव्हे तुमचा 'दोहता'

(नातू) आहे दोहता.'' श्री गुरू अमरदास जी लगेच म्हणाले, ''**दोहता बाणी का बोहिथा.**''

अर्थ - हा माझा नातू आपल्या उपदेशाने लोकांना भवसागरातून तारून नेईल.

**शिक्षण**

आता अरजन देव पाठशाळेत जाण्याच्या वयाचा झाला. श्रीगुरू अमरदासजींनी त्याला शिक्षणासाठी आपल्याजवळ ठेवून घेतले. त्यांनी त्यास पंजाबी भाषा व गुरू बाणी शिकवली. संगीताचेही शिक्षण दिले. त्यावेळी अरजनदेवांचे वय केवळ चार वर्षांचे होते. अरजदेव याचा मामा, बाबा मोहरी याने त्यास गणितात पारंगत केले. श्री गुरू अमरदास यांनी अरजन देव यांना हिंदी व संस्कृत शिकवण्यासाठी पंडित बेणीजी यांची, तर फारसी भाषा शिकण्यासाठी एका मौलवीची नियुक्ती केली. वयाच्या दाहव्या वर्षापर्यंत अरजन देव याने ह्या सर्व भाषा व विद्या आत्मसात केल्या. त्याचबरोबर त्याने घोड्यावर बसणे, भाला फेक, तरवार बाजी आदि शस्त्र विद्या ही आत्मसात केली. पण ह्या सर्वात त्याचे गुरुवाणी वर अधिक प्रेम होते. तो रोज सायंकाळी आपले पिता श्री रामदास ह्यांना निरनिराळ्या रागात गुरुवाणी म्हणून दाखवी. गुरुवाणीच्या गायनात तो तल्लीन होऊन जात असे. ह्याचबरोबर त्याने आपली माता बिबि भानीकडून शिस्त व आज्ञा पालनाचे व पिता श्री रामदास यांचेकडून खरी सेवा म्हणजे काय याचे धडे घेतले.

**विवाह**

श्री गुरू अमरदास यांना अरजन देव आता विवाह योग्य झाला आहे व आपल्या डोळ्यादेखत अरजन देवचा विवाह व्हावा असे वाटले. त्यांनी तसा मनोदय आपले जावई व अरजन देव यांचे वडील श्री रामदास यांचे जवळ व्यक्त केला. तेही त्यांच्याशी सहमत झाले व अरजन देवांचा विवाह मउ गावच्या कृष्णचंद यांची कन्या गंगा हिच्याशी निश्चित झाला. त्यावेळचा एक प्रसंग

वर व वऱ्हाडी मउ गावापाशी येऊन पोहोचले. व्याही स्वागतासाठी सामोरे आले. ते हात जोडून श्री गुरू अमरदासांना म्हणाले, ''आमच्या गावात अशी प्रथा आहे की, वेशीतून गावात प्रवेश करण्यापूर्वी वेशीबाहेर एक मेख रोवलेली असते ती नवर देवाने उपटून मगच गावात प्रवेश करावा.'' त्यांनी शेजारच्या शेतात पुरलेली मेख दाखवली. अरजन देवांनी ती पाहिली व घोड्यावरून भरधाव जाऊन आपल्या हातातील भाल्याचा एकाच जोरदार फेकीने ती मेख उपटून टाकली. अरजन देवांच्या अश्वारोहण व भालाफेकीचे कौशल्य पाहून सारे लोक आश्चर्यचकित झाले.

ह्या विवाहानंतर लवकरच श्री गुरू अमरदासांची आत्म ज्योत परमात्म्याच्या परमज्योतीत विलीन झाली (सप्टेंबर १५७४) त्यापूर्वी त्यांनी आपले जावई श्री रामदास यांची गुरुपदी स्थापना केली. पण श्री गुरू रामदास फार काळ गुरुपदी राहू शकले नाहीत. सन १५८१ मध्ये ते परमात्म्याशी एकरूप झाले. तत्पूर्वी त्यांनी आपल्या तिन्हीं पुत्रांपैकी कोणास गुरुपदी बसवावे हे ठरवण्यासाठी मुलांची एक परिक्षा घेतली.

लाहोरमध्ये श्री गुरू रामदास यांचे एक आप्त श्री सिहारी मल यांच्या मुलाचा विवाह होता. त्याने श्री गुरू रामदास यांना आमंत्रित केले होते. मुलांच्या परिक्षेची ऐती संधी प्राप्त झाली. त्यांनी आपला थोरला मुलगा बाबा पृथीचंद यास लाहोरला जाण्यास सांगितले. पण त्याने व्यापार सोडून लग्नास जाण्यास स्पष्ट नकार दिला. बाबा पृथ्वीचंद हा स्वार्थी व कपटी होता. दुसरा मुलगा महादेव हा संन्यस्त वृत्तीचा होता. त्याने विवाहही केला नव्हता व सर्व मायापाश तोडून टाकले होते. त्याने ही लाहोरला जाण्यास स्पष्ट नकार दिला. अखेर श्री गुरू रामदासांनी श्री अरजन देव यांना लाहोरला जाण्यास सांगितले. पित्याची आज्ञा शिरसावंद्य मानून त्याने जाण्याची तयारी केली. श्री गुरू रामदासांनी आज्ञा केली की त्यांचा निरोप आल्याशिवाय त्यांनी परत येऊ नये. पित्याच्या आज्ञेप्रमाणे श्री अरजन देव लाहोरला गेले. विवाह वगैरे आटोपल्यावर ते आपल्या मूळ पैतृक गावी चुनामंडी येथे गेले.

### पृथ्वीचंदचे कपट

योग्य वेळ येताच म्हणजे सुमारे दोन वर्षे झाल्यावर श्रीरामदास यांनी अरजन देव यांना परत बोलावण्याचा निर्णय घेतला व आपल्या एका शिष्याबरोबर एक पत्र पाठवले. पण पृथ्वीचंदने ते मधेच हडप केले. बरेच दिवस वाट पाहिल्यावर श्री गुरू रामदासांनी परत पत्र लिहिले. ते ही पृथीचंदने अरजन देवांपर्यंत पोहोचू दिले नाही. अखेर श्रीगुरू रामदासांनी तिसरे पत्र आपल्या एका अत्यंत विश्वासू शिष्याकडे देऊन त्यास ते स्वत: अरजन देवास देऊन त्यास घेऊन येण्यास सांगितले. अरजनदेव परत आल्यानंतर सर्व खुलासा झाला व पृथ्वीचंदचे कपट उघडकीस आले.

### अरजन देवांची गुरुपदी नियुक्ती

श्री गुरू रामदास यांना आपली परलोक गमनाची वेळ जवळ आली आहे. ह्याची जाणीव झाली. त्यांनी अरजन देव यांची गुरुपदी नियुक्ती केली व सन १५८१ (१ सप्टेंबर) मध्ये आपली इहलोकीची यात्रा संपवली. त्यावेळी श्री गुरू अरजन देवांचे वय केवळ अठरावर्षांचे होते.

### निर्मिती कार्य

श्री गुरू अरजन देवजी यांनी गुरुपद ग्रहण करताच आपले पिता श्री गुरू रामदास जी यांचे अपुरे कार्य पूर्णत्वास नेण्याचे ठरवले.

### अमृतसरची निर्मिती

सध्या ज्यास अमृतसर म्हणून ओळखले जाते. त्याठिकाणी पूर्वी काहीही नव्हते. श्री गुरू रामदासजी यांनी त्याठिकाणी एक गाव वसवले. त्यास गुरूने वसवलेले गाव म्हणून 'गुरुकाचक्क' (चक्क म्हणजे गाव) असे म्हटले जात असे. त्यास 'रामदास पुरा' असे ही म्हटले जात असे. त्या गावात श्री गुरू रामदासांनी एक तलाव खोदण्यास प्रारंभ केला होता. पण ते कार्य अपुरेच राहिले होते. श्री गुरू अरजन देवांनी ते पूर्णत्वास नेले व त्यास 'अमृतसर' असे नाव दिले. 'सर' म्हणजे सरोवर, अमृताचे सरोव. ह्यावरूनच ह्या शहराचे नाव अमृतसर असे पडले. शीख लोक त्यास आदराने 'श्री अमृतसर' असे संबोधतात.

### तरणतारणची निर्मिती

श्री अरजनदेवांनी अमृतसरच्या दक्षिणेस २० कि.मी अंतरावर तरणतारण हे शहर वसवले. (इ.स. १५९०) व गावाच्या शेजारी तरणतारण हा तलाव ही खोदला त्यासंबंधी एक आख्याइका प्रचलित आहे ती अशी.

तरणतारण गावाजवळ एक जुना तलाव होता. त्याच्या डागडुजीचे काम सुरू होते. श्री गुरू अरजन देव त्याची पाहणी करत होते. त्यावेळी तेथे एक योगी आला. त्याने गुरुदेवांना प्रणाम केला. आपल्या झोळीतून एक भस्माची पुडी काढली व म्हणाला, ''हे भस्म जर लोखंडाला लावले तर त्याचे चांदीत रूपांतर होते व तांब्यास लावले तर त्याचे सोने होते.'' श्री गुरू अरजन देवांनी विचारले, ''ह्याशिवाय ह्याचा अन्य काही उपयोग आहे का ?'' हे भस्म पाण्यात टाकले व त्याने स्नान केले. तर त्याने कुष्ठ रोग बरा होतो. असे योग्याने सांगितले. हे ऐकताच श्री गुरू अरजन देवांनी भस्माची ती पुरचुंडी तलावात विसर्जित केली. योगी म्हणाला, 'गुरुदेव हे काय केलेत ?' श्री अरजनदेव शांतपणे उद्गारले, ''जे योग्य तेच केले. सोने, चांदी, ही सारी माया आहे. ह्याचा आम्हास काय उपयोग? आम्ही मायेपासून चार हात दूर राहू इच्छितो. कारण मायेमुळे मानवाच्या मनात क्रोध, लोभ व अहंकार निर्माण होतो. उलट हे भस्म तलावात टाकल्यामुळे ह्यात जो स्नान

करील तो व्याधी मुक्त होईल. केवढे तरी जन कल्याण होईल.'' योगी निरुत्तर होऊन निघून गेला.

लवकरच ह्याचे प्रत्यंतर आले. एकदा तलावाजवळून काही माणसे एका व्यक्तीस बाजेवर बांधून घेऊन जात होते. श्री गुरू अरजन देवांनी त्यांना थांबवले व विचारणा केली. लोक म्हणाले, ''हा माणूस कुष्ठ रोगी आहे. गावास उपद्रव नको म्हणून आम्ही त्यास रावी नदीत बुडवून टाकणार आहोत.'' श्री गुरू अरजन देवांना त्या कुष्ठ रोग्याची करुणा आली. ते म्हणाले, ''थांबा ! ह्यास काही दिवस येथेच राहू दे. त्यास ह्या तलावातील पाण्याने अंघोळ घाला व त्यास गुरुवाणी ऐकवा. तो निश्चित बरा होईल.'' लोकांनी तसे केले. थोड्याच दिवसात तो कुष्ठ रोगी बरा झाला व आनंदाने आपल्या गावी परत गेला. तेव्हापासून त्या तलावास भवसागर तारून नेणारा म्हणून 'तरणतारण' असे नाव प्राप्त झाले.

तलावाच्या बांध बंदिस्तीसाठी श्री गुरू अरजन देवांनी विटांची भट्टी लावली होती. त्या भागात अमानत खां नावाचा एक बडा सरदार होता. तो आपल्या पित्याच्या स्मरणार्थ सराई बांधत होता. त्याची नजर ह्या विटांवर पडली. त्याने जबरदस्तीने त्या विटा उचलून नेल्या. श्री गुरू अरजनदेवांना ह्या गोष्टीचा फार राग आला ते म्हणाले, ''ज्यासाठी ह्या विटा निर्माण झाल्या त्याच कामास त्या लागल्या पाहिजेत.'' झाले ही तसेच. सरदार बुद्ध सिंघ व सरदार जस्सा सिंघ रामगढ़िया यांनी अमानत खांवर हल्ला करून 'नुरुद्दिन की सराय'ची वीटनवीट उखडून परत आणली व सरोवराचे बांध काम पूर्ण केले. ह्या प्रसंगातून कोणताही अन्याय खपवून न घेण्याचा धडा शीख बांधवांना मिळाला.

**करतारपूरची निर्मिती**

आपल्या धर्म प्रचारासाठी दोआबमध्ये एखादे स्थान निर्माण करणे आवश्यक आहे असे श्री गुरू अरजन देवांना वाटले. म्हणून त्यांनी त्या भागाचा दौरा करण्याचे ठरवले. त्याचवेळे जालंधरचा नबाब नजीम खा तेथे आला होता. तो श्री गुरू अरजन देवांच्या दर्शनार्थ आला. गुरू देवांची तेजस्वी चर्या, त्यांचा उपदेश व सर्वांनी एकत्र बसून भोजन करण्याची लंगर पद्धती पाहून तो अत्यंत प्रभावित झाला. त्याने गुरुदेवांना विचारले, ''गुरुदेव सर्व धर्मात सर्वश्रेष्ठ धर्म कोणता ?'' श्री गुरू अरजन देव उत्तरले, ''खरे तर सर्वच धर्म आपआपल्या परीने श्रेष्ठच आहेत. समस्या ही आहे की त्याचे पालन कोण कसे करतो. जर माणूस धर्माच्या नावावर चालणारे सारे पाखंड व भ्रमाचा त्याग करून त्या एक मात्र प्रभूची, अल्लाची भक्ती करील तर त्यास हे कळून येईल की, सारे लोक त्या एकमेव परमात्म्याची त्या अल्लाचीच लेकरे आहेत.'' ह्या उत्तराने नबाबाच्या मनातील साऱ्या शंका दूर झाल्या. श्री गुरू अरजदेवांना प्रणाम करून तो म्हणाला, ''गुरुदेव जालंधरजवळ आपण एक शहर वसवा. त्यास लागणारी सर्व जमीन मी आपणास फुकट देतो.'' श्री गुरू अरजन देव म्हणाले, ''कोणाकडून काही फुकट घ्यावे हे आमच्या नियमात बसत नाही. आम्ही त्या जमिनीचे मोल आपणास देऊ. त्याचा तुम्ही स्वीकार करावा.'' यथावकाश जमिनीचे खरेदीखत होऊन सन १५९४ मध्ये त्याठिकाणी 'करतारपूर' हे शहर वसविण्यात आले. (श्री गुरू नानक देवांनी ही एक 'करतारपूर'. नगर वसवले आहे. खंड १, पान ४७७ पहा.) 'करतार' म्हणजे परमेश्वर प्रत्यक्ष परमेश्वराचा वास असलेले स्थान ते 'करतापूर' ह्याच नगरात श्री गुरू अरजन देवांनी एक प्रशस्त विहिर खोदली व तिचे नाव 'गंगसर' असे ठेवले. ते म्हणाले, ''येथे प्रत्यक्ष गंगामाई प्रगट झाली आहे. ह्याच्या जलाने स्नान करणाऱ्यास गंगास्नानाचे पूण्य प्राप्त होईल.'' तेव्हापासून गंगसर हे शीखांचे एक पवित्र तीर्थस्थान मानले गेले आहे.

**संतान प्राप्ती**

श्री गुरू अरजन देव व माता गंगादेवीजी यांचा विवाह होऊन बराच काळ लोटला होता. पण त्यांना संतान नव्हते. त्यामुळे माता गंगादेवी दु:खी होत्या. त्यांनी आपली व्यथा आपले पती श्री गुरू अरजन देवजी यांना कथन केली. गुरुदेव

एवढेच म्हणाले, ''परमात्म्याच्या कृपेने गुरूगृही काहीही कमी नाही. आपण विनम्र भावाने ब्रह्मज्ञानी बाबा बुढाजींकडे जा व त्यांना आपली व्यथा सांगून त्यांचे आशीर्वाद मागून पुत्र प्राप्तीची याचना करा. असे करा की भल्या पहाटे उठून स्वहस्ते जात्यावर पीठ दळून त्याची भाकरी करून स्वहस्ते दही घुसळून लस्सी व लोणी घेऊन जा. त्याबरोबर एक कांदा ही घेऊन जा. हे सारे बाबा बुढाजींना अर्पण करा. व त्यांना शरण जा.'' माता गंगा देवींनी तसेच केले व अत्यंत साधा पोशाख परिधान करून त्या बाबा बुढाजींकडे गेल्या व त्यांना प्रसाद अर्पण करून त्यांचे चरणी दंडवत घातले. बाबाजी प्रसन्न झाले. त्यांनी त्यातील कांदा उचललात. बुक्कीने फोडला. असे करत असतानाच ते उद्‌गारले, ''मुली तुझ्या पोटी लवकरच एक शूरवीर पुत्र जन्मास येईल व तो मोगलांचा असाच चेंदामेंदा करील.'' बाबा बुढाजींच्या भविष्यवाणीप्रमाणे लवकरच (९ जून १५९५) माता गंगा देवींना पुत्र प्राप्त झाला. त्याचे नाव 'हरि गोबिंद' असे ठेवण्यात आले. हेच शीखांचे सहावे गुरू श्री गुरू हरगोनिंदराय.

### श्री गुरू ग्रंथ साहिब संकलन

श्री गुरू अरजन देवांचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे श्री गुरू ग्रंथ साहिबचे संकलन. श्री गुरू अरजन देव यांनी त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या सिख गुरुच्या व स्वत:च्या पदरचनांचा एक ग्रंथ तयार केला. त्यात भारतात होऊन गेलेल्या १२ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत सर्व जाती पंथातील ईश्वर भक्तांच्या रचनांचा समावेश करून भारतीय एकात्मतेचा साक्षात्कार घडविणारा ग्रंथ संकलित केला. त्यास त्यावेळी 'आदिग्रंथ' किंवा 'पोथी साहिब' असे म्हटले जात असे. (श्री गुरू ग्रंथ साहिब. खंड १ मधील ग्रंथ परिचय हा लेख पहावा.)

### हरिमंदिराची निर्मिती व श्री आदि ग्रंथाची स्थापना

अमृतसर तलावाच्या खोदकामानंतर श्री गुरु अरजन देवांनी त्या सरोवराच्या मध्यभागी एका मंदिराची उभारणी केली होती. पण त्यात कोणत्या ही देवतेची स्थापना केली नव्हती. कारण ईश्वर हा एकमेव असून तो निर्गुण निराकार आहे. अशी शीखांची धारणा आहे. त्याकाळी हिंदु मंदिरात नीच जातींच्या लोकांना प्रवेश नव्हता. हा त्यांच्यावर अन्यायच होता. म्हणून अरजन देवांनी हरिमंदिरास चारही दिशेस दरवाजे ठेऊन चारही वर्णाच्या लोकांस त्यात प्रवेश असल्याचे सूचित केले.

आता आदि ग्रंथाचे संकलन झाल्यानंतर भाद्रपद शु १ संवत १६६९ (ऑगस्ट १६०४) ह्या दिवशी त्यास हरि मंदिरात सर्वोच्च स्थानी स्थापित केले. त्याचे पहिले ग्रंथी म्हणून श्री गुरू नानक देवांचे वयोवृद्ध शिष्य बाबा बुढाजी यांची नियुक्ती केली.

**सत्ता व बलवंड –** सत्ता व बलवंड हे पिता पुत्र श्री गुरू अरजन देवांच्या दरबारात कीर्तन करत. त्यांचा मधुर आवाज व कीर्तन शैलीने सारा जनसमुदाय आनंदित होत असे.

एक दिवस सत्ता श्री गुरू अरजन देवांना म्हणाला, ''गुरुजी माझ्या मुलीचे लग्न आहे. मला काही आर्थिक मदत करा.'' गुरुदेव म्हणाले, ''ठीक आहे. आजच्या कीर्तनात जी काही दक्षिणा जमा होईल ती तुझी.'' पण त्यादिवशी कीर्तनात नेहमीपेक्षा खूपच कमी दक्षिणा जमली. सत्ता हिरमुसला झाला. पृथीचंदला ही गोष्ट कळताच त्याने सत्ताचे मन श्री गुरू अरजन देव यांच्या विरुद्ध भडकवले. त्याने त्यास सांगितले की तुला पैसे मिळू नयेत म्हणून जमलेल्या लोकांना कमी पैसे टाकण्यास अरजन देव यांनीच सांगितले होते. झाले, सत्ता व बलवंड भडकले. ते भर दरबारात श्री गुरू अरजन देवांना अपशब्द बोलले व म्हणाले, ''आम्ही कीर्तन करतो म्हणून तर तुम्हाला पैसे मिळतात. आमच्या मुळे लोक तुमचा आदर

करतात. नाहीतर तुम्हाला कोण विचारतो!'' श्री गुरू अरजन देवांनी सौम्य शब्दात त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. उलट ते अधिकच उद्धपणे बोलू लागले. अखेर गुरुजींनी त्यांना हकलून दिले व प्रत्यक्ष गुरूसाहिबांचा अपमान केल्याबद्दल जनतेने त्यांच्याशी कोणतेही संबंध न ठेवण्याचा आदेश दिला व स्वत: हाती टाळ घेऊन कीर्तन करण्यास उभे राहिले. त्यांचे कीर्तन इतके रंगले की सारे लोक अत्यंत आनंदित झाले. व दिवसेंदिवस कीर्तनास लोकांची गर्दी वाढू लागली.

शेवटी सत्ता व बलवंड यांना पश्चात्ताप झाला. पृथीचंदचा कावा कळून आला. पण गुरुजीसमोर प्रत्यक्ष हजर होण्याचे धाडस त्यांना होईना. अखेर ते लाहोरच्या भाई लद्धाकडे गेले. श्री गुरू अरजन देव त्यांचा आदर करत असत. भाई लद्धानेही त्यांची खूप निर्भत्सना केली व म्हणाले, ''प्रत्यक्ष गुरूची निंदा हा घोर अपराध तुम्ही केला आहे. ह्यास क्षमा नाही. तुम्ही नरकात पडला.'' सत्ता व बलवंड अत्यंत काकुळतीस आले. शेवटी भाई लद्धाजींना त्यांची दया आली व त्यांनी मध्यस्ती करण्याचे मान्य केले. भाई लद्धाजींनी आपले तोंड काळे केले व गाढवावर बसून श्री गुरू अरजन देवांकडे आले व त्यांना विनम्रपणे सत्ता व बलवंड यांना क्षमा करण्यासाठी वारंवार प्रार्थना करू लागले. अखेर श्री गुरू अरजन देवांचेही मन द्रवले व त्यांनी सत्ता व बलवंड यांना क्षमा करून त्यांना आपल्या सेवेत परत रुजू करून घेतले. त्यांनी ही मनोभावे गुरू सेवा करून आपल्या पापाचे क्षालन केले. त्यांनी गुरू स्तुतीपर रामकली रागातील वार रचनाही केली. श्री गुरू अरजनदेवांनी ती श्री आदि ग्रंथात समाविष्ट केली आहे. (श्री. गु. ग्रं. सा. पान ९६६ ते ९६८)

**भाई मंझ –** भाई मंझ हा होशिआरपूर जिल्ह्यातील करामई गावचा एक श्रीमंत जमिनदार होता. तो सखी सरवर (एक मुस्लिम पंथ) ह्या पंथाचा अनुयायी होता. त्याच्या प्रचारासाठी त्याने गावोगावी पीरखाने बांधले होते. एकदा भाई मंझ आपल्या सहकाऱ्यांबरोबर 'निगाहे पीर' च्या यात्रेला चालला होता. वाटेत त्यास काही शीख लोक भेटले ते श्री गुरू नानक देवांची पदे गात होते. ती पदे व त्यातील मौलिक विचार ऐकून तो अत्यंत प्रभावित झाला. त्याने त्यांचेकडे अधिक चौकशी केल्यावर त्यास कळले की अमृतसरमध्ये पांचवे गुरू श्री अरजन देव हे नानकांचाच अवतार असून ते नानकांचेच आध्यात्मिक ज्ञान देत आहेत. तो अमृतसरला आला. त्याने पाहिले की श्री गुरू अरजन देव अत्यंत विनम्र भावाने सेवा करत आहेत. त्यांनी निर्माण केलेले अमृत सरावेर व त्याचा महिमा ऐकून श्री गुरू अरजन देवांविषयी त्याच्या मनात भक्तीभाव निर्माण झाला. त्याच्या प्रवचनातील ईश्वर भक्तीपर विचार ऐकून तो तृप्त झाला व त्याने श्री गुरू अरजदेवांना आपणास शीख करून घ्यावे अशी विनंती केली. गुरुदेव त्याला म्हणाले, ''तू तर सखी सरवरचा सेवक आहेत. शीख होणे इतके सोपे नाही. खरे शिष्यत्व तर केसाहून सुक्ष्म व तरवारीच्या धारेहून तीक्ष्ण आहे. ते एक असिधारा व्रतासारखे आहे. ते पाळणे महा कठीण आहे. त्यासाठी मनातली क्रोध, मोह अहंकार आदि विकारांचा संपूर्ण त्याग करावा लागतो. केवळ शीख होऊन चालत नाही. तर त्यासाठी शिष्यत्वाचे वर सांगितलेले सर्व नियम काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे. जमेल हे तुला?''

हे शब्द ऐकून तो अंतर्मुख झाला. त्याने मनोमन काही निश्चय केला. तो आपल्या गावी परतला. त्याने आपल्या घरातील पीरखाना तोडून टाकला. सर्व मायापाश तोडून टाकले. निर्मोही व विनम्र बनून तो परत अमृतसरला आला. 'सेवा हीच साधना' ह्या तत्त्वाचा त्याने अंगिकार केला व सारा दिवस सेवेत मग्न झाला.

एकदा तो लंगरसाठी लाकडे तोडून डोक्यावर मोळी घेऊन गुरू घरी परत येत होता. रात्र झाली होती. अंधार पडला होता. वादळ आले व तो एका विहिरीत पडला. पण त्याने लाकडे वरचेवर धरून भिजू दिली नाहीत. लोकांना भाई मंझ विहिरीत पडल्याचे कळले. लोक त्याला काढण्यासाठी दोर घेऊन धावले. भाई मंझ म्हणाला, ''प्रथम ही मोळी वर घ्या.

त्याला पाणी लागू देऊ नका. मग मला वर काढा.''

श्री गुरू अरजन देवांना ही घटना कळली तेव्हा ते प्रसन्न झाले. भाई मंझला सेवेचे मर्म कळले आहे. खरे शिष्यत्व त्याने आत्मसात केले आहे. हे त्यांनी ओळखळे. ते म्हणाले, ''भाई मंझ तुझी साधना आज सफल झाली. तुला काय हवे ते माग.'' मंझ म्हणाला, ''मला प्रभू नामाचा कधीही विसर पडू नये. माझे मन सदैव तितीक्षा व संतोष यांनी भरलेले रहावे. येवढेच वरदान द्या.'' भाई मंझचे हे उद्‌गार ऐकून श्री गुरू अरजनदेव प्रसन्न झाले. त्यांच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले.

**मंझ पिआरा गुरू का गुर मंझ पिआरा।**
**मंझ गुरू का बोहिथा जग लंघण हारा॥**

गुरूला मंझ प्रिय आहे व मंझला गुरू प्रिय आहे. दोघे एकरूप झाले आहे. व आता मंझ गुरूला तारून नेणारा व साऱ्या जगाचा उद्धारकर्ता आहे.

भाइ मंझच्या सेवा व त्यागावर प्रसन्न होऊन श्री गुरू अरजनदेवांनी त्यास गुरुवाणीचा प्रचारक म्हणून त्याच्या मूळ गावी पाठवून दिले.

**पृथीचंदचे कपट कारस्थान –** पृथीचंदला डावलून त्याच्याहून लहान असलेल्या अरजन देवास श्री गुरू रामदास यांनी गुरुपद दिले. त्यामुळे पृथीचंद श्री गुरू अरजन देवांचा हेवा करत होता. सत्ता व बलवंड यांना त्यानेच फूस दिली होती. बरेच दिवसांनी अरजनदेवांना पुत्र प्राप्ती झाली होती. त्याचा आनंद होण्याऐवजी पृथीचंदाची ईर्षा अधिकच वाढली. व त्याने हर गोबिंदरायची हत्या करण्याचे अनेक प्रयत्न केले. पण प्रत्येक वेळी हरगाविंदराय त्यातून सुखरूपणे बाहेर पडला. देव तारी त्याला कोण मारी ?

सर्व प्रयत्न थकल्यावर पृथीचंद मोगल राज्यकर्त्यांना सामील झाला. त्याने सुलहीखानला विनंती केली. की, अरजदेवला अमृतसरमधून हकलून लावा. सुलहीखानने आपला भाचा सुलबी खान याचावर ही जबाबदारी सोपवली. तो शीखांची कत्तल करीत अमृतसरकडे निघाला. पण अमृतसरला पोहोचण्याच्या आधीच त्याच्याच एका सहकाऱ्याने त्याचा वध केला. ही वार्ता सुलहीखानला कळली. तो आपली सेना घेऊन हेहर गावी पृथीचंदकडे अरजनदेवांवर स्वारी करण्यासाठी आला. पृथीचंदने त्याचे जंगी स्वागत केले. संध्याकाळी ते घोड्यावर बसून पृथीचंदने सुरू केलेली वीटभट्टी पाहाण्यास गेले. भट्टीच्याजवळ पोहोचताच सुलहीखानचा घोडा एकाएकी बिथरला व सुलहीखानसकट भट्टीवर जाऊन आदळला. व भट्टीत जळून खाक झाला. 'देव तारी त्याला कोण मारी ?' ह्याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला.

**बादशाहा अकबरकडे तक्रार**

जेव्हा श्री आदि ग्रंथाचे संकलन चालू होते. तेव्हा अनेक लोक आपली पदे घेऊन. श्रीगुरू अरजन देवांकडे येत असत. त्यात एक 'भक्त कान्हा' होता. त्याच्या रचना अयोग्य वाटल्याने श्री गुरू अरजन देवांनी त्या संमिलित करण्याचे नाकारले. त्याचा राग येऊन बदला घेण्याचे त्याने ठरवले. चंदूकडील सोयरिक नाकारल्याने तोही श्री गुरू अरजन देवांचे विरुद्ध होता. त्या दोघांनी एकत्र येऊन ब्राह्मण व फकिरांना चिथावले व त्यांना अकबराकडे अर्ज करावयास लावले. अर्जात म्हटले होते की, आदि ग्रंथात हिंदू व मुसलमान धर्माची निंदा नालस्ती केली आहे. त्याची चौकशी होऊन अरजन देवांना शिक्षा व्हावी.

वास्तविक अकबर बादशहाला शीख गुरूंची चांगली माहिती होती. पण तरीही त्याने श्री गुरू अरजन देवांना आदि ग्रंथ घेऊन बोलावले. श्री गुरू अरजन देवांनी भाई गुरुदास व बाबा बुढाजी यांना ग्रंथ घेऊन पाठवले. दरबार भरला आदि ग्रंथातले कोणतेही पान उघडण्यात आले. त्यावर शब्द होते.

**खाकनुर करंद आलम दुनिआइ ।।**
**असमान जिमि दरखत आब पैदाइसि खुदाइ ।।१ ।।**
**बंदे चसम दीदं फनाइ ।।**
**दुनिआ मुरदार खुरदनी गाफल हवाइ ।।रहाउ ।।**

(**अर्थ –** माती व आत्मतत्त्व ह्यातून हे जग निर्माण झाले आहे. आकाश, धरती, वृक्ष, पाणी हे सारे खुदानेच निर्माण केले आहे. ही सारी दृष्यमान सृष्टी नश्वर आहे. ह्या दुनियेतील सारे लोक हरामचा माल खातात व खुदास विसरून गेले आहेत.) हे ऐकून अकबर बादशाहा खूष झाला व म्हणाला, ''वाह! ही तर अलाहची स्तुती आहे.'' पण फकीर व ब्राह्मण यांचे समाधान झाले नाही. त्यांनी आणखी एक पान उघडावयास लावले. त्यातही अलाहची स्तुतीच आढळून आली परत तिसरे पान उघडले त्यावर पद होते.

**अवलि अलह नूर उपाइआ कुदरती के सभ बंदे ।**
**एक नूर ते सभु जगु उपजिआ कउन भले को मंदे ।**

**अर्थ –** सर्व प्रथम अल्लाने आपली प्रकाश ज्योत निर्माण केली व आपल्या शक्ती सामर्थ्याने सारी सृष्टी निर्माण केली. एकाच परमज्योतीपासून सारे निर्माण झाले असल्याने कोण चांगलं व कोण वाईट. सारेच सारखे. सारीच अल्लाचीच लेकरे.

आता अकबराचे पूर्ण समाधान झाले तो म्हणाला, ''हा एक अद्वितीय ग्रंथ आहे. ह्यात अलाहच्या स्तुती व अलाहच्या भक्तीशिवाय अन्य काहीही नाही. ह्यात कोणत्याच धर्माची निंदा केलेली दिसत नाही.'' फकीर व ब्राह्मण मान खाली घालून निघून गेले. अकबराने स्वहस्ते ग्रंथासमोर शंभर मोहरा समर्पित केल्या भाई गुरुदास व भाई बुढा यांची सन्मानाने रवानगी केली.

**श्रीगुरू अरजन देवांचे हौतात्म्य**

ऑक्टोबर १६०५ मध्ये अकबराचा मृत्यू झाला. व सारेच चित्र पालटले. अकबराचा थोरला मुलगा खुसरो व सलीम (जहांगिर) यांच्यात गादीसाठी लढाई होऊन खुसरो पराभूत होऊन काबूलकडे पळून जात असता वाटेत श्री अरजन देव यांना भेटला व त्याने त्यांना नमस्कार केला. व आशिर्वादाची याचना केली. श्रीगुरू अरजनदेवांनी त्याच्या कपाळी केशरी टिळा लावला व वाट खर्चासाठी काही द्रव्य दिले.

त्याच्या पाठलागावर असलेल्या जहांगिरला हे कळले. तो आधीपासूनच शीख लोकांच्या व शीख धर्मगुरूंच्या विरुद्ध होता. त्याला अयतेच निमित्य मिळाले. त्याने लाहोरचा सुभेदार मुर्तजाखान याला श्री अरजन देव यांना ताबडतोबा अटक करण्यास फर्मावले. त्याप्रमाणे तो अमृतसर येथे जाऊन श्री अरजन देवांना अटक करून लाहोरला घेऊन गेला. ह्याची परिणिती काय होणार ते श्री गुरू अरजनदेवांनी ओळखले होते. त्यांनी भाई गुरुदास भाइ बुढा व आपला पुत्र श्री हरगोबिंदराय यांना बोलवून घेतले व सांगितले, ''ह्या पुढील काळ फार कठीण आहे. हाती शस्त्र घेतल्याशिवाय धर्माचे रक्षण होणे शक्य नाही. 'सत् रक्षणाय, खल निर्दलाय' शक्य त्या मार्गाने शीखांना सशत्र करा. हरगोबिंदरायला गुरू पदी विराजमान करा.'' हरगोबिंदराय यास बजावून सांगितले की, ''गुरू गदीवर बसताना सदैव जवळ शस्त्र बाळग.'' त्याप्रमाणे बाबा बुढाजींनी श्री हरगोबिंदराय यांना दि. १५ में १६०६ रोजी गुरुपदी स्थापित केले.

लाहोर येथे श्री गुरू अरजनदेवांना जाहांगिर समोर उभे करण्यात आले. त्यांना दोन अटी घालण्यात आल्या. १) आदि ग्रंथात महमद पैगंबराच्या स्तुतीवर कवने घाल. २) इस्लाम धर्माचा स्वीकार कर. श्री गुरू अरजन देवांनी दोन्हीं

अटी नाकारल्या. पुढे श्री गुरू अरजन देवांवर खटला चालवल्याचे नाटक करून 'यासा' कायद्यान्वये त्यांना हाल हाल करून मारण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. श्री गुरू अरजन देव शांत चित्ताने मरणास सामोरे गेले.

पाच दिवस त्यांचे हाल चालू होते. त्यांना गरम तव्यावर बसवण्यात आले. अंगावर गरम वाळू टाकण्यात आली. अंगावर उकळते पाणी टाकण्यात आले. अंगावर सर्वत्र फोड उठले तरीही श्री गुरू अरजन देव शांत होते. मुखाने म्हणत होते.

**तेरा कीआ मीठा लागे हरि नाम पदारथु नानकु मांगै ।।**

''हे प्रभो ! तू जे जे करतोस ते चांगलेच असते. मला अन्य काहीही नको. हे प्रभो ! मला केवळ तुझे नाम दे. हा नानक तुझ्याकडे प्रभू नामाचीच याचना करतो.''

दि. ३० मे १६०६ रोजी श्री गुरू अरजन देव यांना हात पाय बांधून रावी नदीत फेकून देण्यात आले.

**श्री गुरू अरजन देवांची कार्याचे मुल्यमापन.**

श्री गुरू अरजन देवांची सुमारे पंचवीस वर्षे गुरुपद सांभाळले. ह्या काळात त्यांनी महान कार्य करून शीख संप्रदायास बळकटी प्राप्त करून दिली.

अमृतसरची निर्मिती करून शीखांसाठी एक मध्यवर्ती स्थान प्राप्त करून दिले. तरणतारणच्या निर्मितीने शीखांना एक तीर्थ क्षेत्र निर्माण करून दिले. आदिग्रंथाच्या संकलनाने शीखांना एक धर्म ग्रंथ उपलब्ध करून दिला. सन १५९५ मध्ये पंजाबात पडलेल्या दुष्काळात त्यांनी गावोगावी विहिरी खणून लोकांना शेतीसाठी व पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले. दसवंद पद्धती सुदृढ करून ह्या सर्व कार्यासाठी व धर्म प्रसारासाठी आर्थिक पाठबळ निर्माण केले. त्यांनी सतीची चाल बंद केली. विधवा विवाहास प्रोत्साहन दिले. वडाली गावात सहा रहाट एका वेळी चालतील येव्हढी मोठी विहिर खोदली.

वास्तविक ही सर्व कामे राजाची. पण श्री गुरू अरजन देवांनी एका धर्मपुरुषाने केवळ लोकाश्रयावर एवढे मोठे कार्य केले. म्हणूनच लोक त्यांना 'सचा पातशाहा' म्हणू लागले. त्यांच्या हौतात्म्याने तर त्यांनी सर्वाच्य अंत:करणात कायमचे आदराचे स्थान प्राप्त केले.

धन्य ते गुरू अरजन देव व धन्य त्यांचे हौतात्म्य !

◆ ◇ ◆